




RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784








वर्ष ३ रे अंक : ३५ वा गुरूवार दि. ०६ मार्च २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये


# लक्षवेधीवर लक्षवेधी,तरीही शासनाचे लक्ष का जात नाही?

## जिल्हा रुग्णालय भ्रष्टाचार प्रकरणी आ. गायकवाडांची पुन्हा एकदा लक्षवेधी...

### ऑगस्ट २०२४ ला विभागीय समिती अहवालात दोषी भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे यांची संपत्ती जप्त करून लिलाव करा व येणारा सर्व पैसा शासन जमा करा तरीही उपसंचालक अकोला डॉ भंडारी कारवाईस एवढी दिरंगाई का करत आहे.

**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात बोकाळलेल्या भ्रष्टाचार प्रकरणी सातत्याने चहूबाजूंनी प्रचंड गदारोळ होताना दिसून येत आहे. मात्र एव्हढे होऊन देखील राज्य शासन आणि त्यांचे प्रशासन या प्रकरणी अजूनही ढिम्मच असल्याचे दिसून येत आहे. आमदार संजय गायकवाड यांनी या प्रकरणी पुन्हा एकदा लक्षवेधी उपस्थित करून शासनाचे या महाभयंकर आणि अजस्त्र भ्रष्टाचाराकडे लक्ष वेधण्याचे काम केले, परंतु तरीही शासनाकडून सातत्याने या गंभीर विषयाकडे दुर्लक्षच करण्यात येत आहे. येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात उपकरणे आणि औषधांपासून ते स्टेशनरीपर्यंत आजवर शेकडो कोटींचा भ्रष्टाचार झालेला आहे. या भ्रष्टाचाराला कोरोनासारख्या महामारीच्या काळात तर प्रचंड ऊत आला होता. या भ्रष्टाचाराच्या गटारगंगेत अनेकांनी आपले हात धुवून घेतले व भ्रष्टाचाराच्या पैशातून अत्यंत बेशरमपणे अवैध संपत्ती देखील जमा केल्या. उपकरणे, औषधी खरेदीचा हा घोटाळ्याचा आकडा तब्बल २०० कोटींपेक्षाही जास्त असल्याचा आरोप होतो आहे. यासंदर्भात दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज व सामाजिक कार्यकर्ता चंद्रकांत खरात यांनी सातत्याने शासन-प्रशासनाचे लक्ष वेधण्याचे काम केलेले आहे. या घोटाळ्यासंदर्भात तक्रारकर्ता खरात व दैनिक जनसंचलन सिटी न्यूजने सर्वप्रथम खुलासा केल्यानंतर त्यावर मोठा गदारोळ झाला. अनेक सामाजिक संघटना, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते यांनी रान उठवण्याचे काम केले. जिल्हा रुग्णालयात हा भ्रष्टाचार अत्यंत शिस्तबद्ध व सामूहिक पद्धतीने चालतो. या ठिकाणी अनेक जण भ्रष्टाचाराच्या घाणीत बरबटलेले असल्या कारणाने प्रत्येक जण दुसऱ्याला वाचवण्याचा प्रयत्न करतो. सत्या सिनेमामध्ये एक सुप्रसिद्ध डायलॉग आहे की, अगर एक गया, तो सब जाएंगे. या उक्तीप्रमाणे प्रत्येक जण भ्रष्टाचारात सामिल आपल्या सहकाऱ्याला वाचवण्याचा प्रयत्न करतो. हा प्रयत्न खालपासून वरपर्यंत होत असल्याने या प्रकरणी फारच थातूरमातूर कारवाई होताना दिसून येते. आमदार संजय गायकवाड सह इतर आमदार यांनी यापूर्वीही वारंवार यासंदर्भात विधानसभेत लक्षवेधी उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधण्याचे काम केलेले आहे. जिल्हा रुग्णालयात झालेल्या या कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचारामुळे एकीकडे शासनाला चुना लागतो आहे, तर दुसरीकडे सामान्य नागरिकांना अगदी सामान्य आरोग्य सुविधा देखील मिळत नसल्याचे दिसून येत आहे.काही महिन्यांपूर्वी भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे हल्ली मुक्काम गोरक्षण रोड परीसर यांच्यावर फक्त निलंबनाची कारवाई करण्यात आली. या घोटाळ्यासंदर्भात जेंव्हा चौकशी समिती स्थापन झाली होती, त्या चौकशी समितीने स्पष्ट नमूद केले होते की, प्रकाश बोथे यांनी अत्यंत बेबंदपणे भ्रष्टाचार केलेला आहे. त्यांनी केलेल्या भ्रष्टाचाराच्या रकमेच्या वसुलीसाठी त्यांची चल अचल संपत्ती जप्त करावी व ती लिलाव करून येणारा सर्व रुपये शासन तिजोरीत जमा करावी त्यांच्यावर फौजदारी कारवाई करावी. या समितीत एक सदस्य विद्यमान आरोग्य उपसंचालक कमलेश भंडारी हे देखील होते. ते आता आरोग्य उपसंचालक आहेत, परंतु डॉ. भंडारी हे सातत्याने या प्रकरणी पुढील कारवाईस टाळाटाळ करीत आहेत. राज्यातील विद्यमान शासन एकीकडे आपण स्वच्छ प्रशासन देत असल्याचे ढोल बडवत असते, तर दुसरीकडे दिव्याखाली अंधार या उक्तीप्रमाणे खाली भ्रष्टाचार प्रचंड पसरलेला आहे. एखाद्या घोटाळ्या प्रकरणी एक आमदार वारंवार विधानसभेत लक्षवेधी उपस्थित करीत आहे, तरीही राज्य शासन मात्र अत्यंत ढिम्म आणि ढिसाळपणा दाखवत असल्याने शासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. या वेळी पुन्हा एकदा आमदार संजय गायकवाड यांनी लक्षवेधीची सूचना दिलेली आहे. मात्र




यापूर्वीच्या लक्षवेधीवर काय कारवाई झाली, हे शासनाने जाहीर करणे गरजेचे आहे. एका आमदाराच्या लक्षवेधीकडे सरकार एव्हढे दुर्लक्ष का करीत आहे, हे अद्यापपर्यंत गुलदस्त्यातच आहे. या भ्रष्टाचारात अनेक बडे मासे गुंतलेले आहेत, त्यामुळे तर कारवाई करण्यास टाळाटाळ होत नाही ना, अशी शंकाही नागरिकांमधून उपस्थित केली जात आहे. जिल्हा रुग्णालयात झालेल्या भ्रष्टाचारात गेल्या अनेक वर्षांत या ठिकाणी येऊन गेलेल जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पंडित, डॉ. तडस, तसेच अनेक प्रभारी जिल्हा शल्यचिकित्सकांसह बरेच अधिकारी व कर्मचारी देखील गुंतलेले आहेत. परंतु कारवाई मात्र अत्यंत जुजबी करून हा भ्रष्टाचार दाबण्याचा प्रयत्न होतो आहे. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने या मुद्द्याला घेऊन जनतेत जागृती करणे व दोषींच्या विरोधात शासनाकडे पाठपुरावा करण्याचे काम सुरू आहे. भ्रष्टाचारासंदर्भात झिरो टॉलरन्सची नीती घेऊन दैनिक जनसंचलन काम करीत आहे. त्यामुळे आगामी काळातही या विषयावर आवाज उठवण्याचे काम आम्ही करीतच राहणार आहे.

# मोहोज शेतशिवातील विहिरीत आढळला मृत बिबट्या !

**जनसंचलन/ रुईखेड मायंबा**

तालुक्यातील मोहोज शेतशिवारातील एका विहिरीत बिबट्याचा मृतदेह आढळून आला. ही घटना रुईखेड मायंबा गावापासून दोन किलोमीटर अंतरावर, मोहोज शेतशिवारात घडली. शेतकरी अंबादास बाबूराव साळवे यांच्या गट क्रमांक १९/२६ मधील कोरड्या विहिरीत बिबट्याचा मृतदेह सडलेल्या अवस्थेत आढळला. शेतात काम करत असताना दुर्गंधी आल्याने शेतकऱ्यांनी परिसराची पाहणी केली. विहिरीत डोकावल्यावर मृत बिबट्या दिसला. त्यांनी तत्काळ वन विभागाला माहिती दिली. ४ मार्च रोजी संध्याकाळी वनपाल बकाल, वनरक्षक बदर, पशुवैद्यकीय अधिकारी द्यावणे, तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी अभिजित ठाकरे घटनास्थळी पोहोचले. संबंधित अधिकाऱ्यांनी विहिरीत उतरून बिबट्याचे शवविच्छेदन केले. त्यानंतर मृतदेह कापडी पिशवीत भरून बुलढाणा येथे पाठवण्यात आला. तहसीलदार विठ्ठल



कुमरे आणि वनपरिक्षेत्र अधिकारी अभिजित ठाकरे यांच्या उपस्थितीत बिबट्याचे दहन करण्यात आले.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# वैश्विक समृद्ध समाजाची निर्मिती...

## संपादकीय लेख

विकिपीडिया दिन दरवर्षी १५ जानेवारी रोजी साजरा केला जातो. २००१ साली जिमी वेल्स आणि लॅरी सँगर यांनी विकिपीडियाची स्थापना केली. हा दिवस जगातील सर्वात मोठ्या मुक्त ज्ञानकोशाच्या स्थापना दिवसाचा सन्मान करण्यासाठी समर्पित आहे. विकिपीडिया दिन हा विकिपीडियाचा वाढदिवस साजरा करण्याचा एक प्रसंग आहे. दरवर्षी १५ जानेवारी रोजी किंवा त्याच्या आसपास विकिपीडियाचे चाहते विकिपीडियावर चर्चा करण्यासाठी आणि केक सामायिक करण्यासाठी त्यांच्या स्वत: च्या समुदायांमध्ये त्यांच्या स्वत:च्या पार्टीचे आयोजन करतात. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा हा महत्वपूर्ण लेख अभ्यासा... संपादक.

विकिपीडिया ही एक डिजिटल प्लॅटफॉर्म असून जगभरातील लोकांना विविध विषयांवरील माहिती उपलब्ध करून देते. याचे वैशिष्ट्य म्हणजे लोक स्वत:च यात लेख संपादित आणि अद्ययावत करू शकतात. यामुळेच विकिपीडिया ज्ञानाचा एक मुक्त स्त्रोत बनला आहे. आजक विकिपीडिया ३००पेक्षा अधिक भाषांमध्ये उपलब्ध आहे आणि जगभरातील कोट्यवधी लोक या ज्ञानकोशाचा उपयोग करतात. शिक्षण, संशोधन आणि माहितीची देवाणघेवाण यासाठी विकिपीडियाचा उपयोग अमूल्य ठरतो. विकिपीडिया दिन आपल्याला ज्ञानाच्या मुक्त प्रवाहाचे महत्त्व पटवून देतो. यामुळे जगातील प्रत्येकाला शिक्षण आणि माहितीचा सहज आणि विनामूल्य प्रवेश मिळतो, ज्यामुळे जागतिक पातळीवर समृद्ध समाजाची निर्मिती होते.

विकिपीडिया दिवसाचा इतिहास-

एक काळ असा होता, जेव्हा विद्यार्थी आणि संशोधकांना एखाद्या विषयाची माहिती मिळवण्यासाठी लायब्ररीतील अनेक पुस्तकांमधून जावे लागत असे. हा तो काळ होता जेव्हा इंटरनेट आजच्या नावीन्यतेच्या शिखरावर पोहोचले नव्हते. तथापि, आपल्याला माहित असलेले जग, जेव्हा हे शोध इंजिन तयार झाले, तेव्हा पूर्णपणे विकसित झाले आणि लोकांना अनेक विषयांवर माहिती देण्यासाठी असंख्य वेबसाइट तयार केल्या गेल्या. यापैकी एक प्रसिद्ध वेबसाइट ङ्गङ्गविकिपीडियाङ्गङ्ग आहे. ज्याला मोफत इंटरनेट विश्वकोश म्हणूनही ओळखले जाते. ना-नफा विकिमीडिया फाउंडेशनच्या देखरेखीखाली, लेखांची निर्मिती आणि विकास सुलभ करण्यासाठी वेबसाइट ओळखली जाते. विकिपीडियाच्या इतिहासाबद्दल येथे थोडे अधिक आहे. सन १९९६मध्ये जिमी वेल्सने बोमिस, इंक. या वेब पोर्टल कंपनीची स्थापना केली तेव्हा हे सर्व सुरू झाले. मार्च २०००पर्यंत, वेल्सने जगासमोर ङ्गङ्गन्यूपीडियाफ्फची ओळख करून दिली. हा एक विनामूल्य ऑनलाइन विश्वकोश होता ज्यामध्ये मुख्य संपादक आणि प्रकाशित केलेल्या माहितीचे पुनरावलोकन करणाऱ्या व्यक्तींचा एक संघ होता. सन २००१मध्ये, न्यूपीडियाला विकी सॉफ्टवेअरसह पूरक केले गेले आणि विकिपीडिया हे न्यूपीडिया डॉट कॉमचे वैशिष्ट्य म्हणून लाँच केले गेले. तथापि, अनेक चर्चे नंतर, विकिपीडिया स्वतंत्र वेबसाइट म्हणून पुन्हा सुरू करण्यात आले आणि पहिल्या वर्षात २० हजारहून अधिक लेख प्रकाशित करण्यात यशस्वी झाले! यामध्ये फ्रेंच, जर्मन, पोलिश, डच, हिब्रू, चायनीज आणि एस्पेरांतो अशा १८ वेगवेगळ्या भाषांमधील कामांचा समावेश आहे.

आज, ती जगातील सर्वाधिक भेट दिलेल्या साइट्सपैकी एक बनली आहे आणि तिच्याकडे स्वारस्य असलेल्या जवळजवळ प्रत्येक विषयाशी संबंधित माहिती आहे. तथापि, साइटद्वारे वापरलेल्या योग्य संदर्भांच्या अभावामुळे शाळा आणि विद्यापीठे टर्म पेपरमध्ये विकिपीडिया वापरण्याची परवानगी देत नाहीत.

१५ जानेवारी रोजी विकिपीडिया दिन- या साइटचा जन्म झाला. जगातील जवळजवळ प्रत्येक व्यक्तीला विकिपीडिया काय आहे, हे माहित आहे. जेव्हा आपण काहीतरी शोधतो, तेव्हा विकिपीडिया लिंक ही पहिली असते, जी आपल्या शोध इंजिनवर पॉप अप होते. ही एक लोकप्रिय साइट देखील आहे; कारण ती सखोल माहिती प्रदान करते आणि वापरकर्ता-अनुकूल मार्गाने सर्वकाही सादर करतो. त्यामुळे अधिक त्रास न करता, हा दिवस त्या माहिती प्रदात्याला समर्पित करूया... जो पहिल्या दिवसापासून आपल्याला ज्ञान देत आहे, हे विशेष!

# श्रम संस्काराशिवाय पर्याय नाही: प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर



जनसंचलन/ खामगाव

स्थानिक विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचालित गो.से विज्ञान,कला वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन दिनांक ०२ मार्च २०२५ रविवार रोजी दत्तक ग्राम ज्ञानगंगापूर येथे पार पडले. या कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व विद्यापीठ गीताने झाली. आपल्या प्रास्ताविकामध्ये कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ. दीपक नागरिक यांनी शहरातील विद्यार्थ्यांना ग्रामीण संस्कृतीची जाणीव व्हावी व तसेच राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या शिबिराच्या माध्यमातून प्रत्यक्ष संस्कार विद्यार्थ्यात रुजवले जावे हा उद्देश निवासी श्रमसंस्कार शिबिराचा असल्याचे सांगितले. शिबिराचे उद्घाटन ज्ञानगंगापूर गावचे प्रतिष्ठित नागरिक श्री. शिवदास महाले पाटील यांनी केले व शिबिरासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच शिबिरासाठी गावकर्यांच्या वतीने पूर्ण सहकार्य होईल अशी ग्वाही दिली. महिला कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ. नीता बोचे यांनी शिबिराची सर्व कार्यक्रमावली समजून सांगितली. तर सहाय्यक कार्यक्रमाधिकारी प्रा. उमेश खंदारे यांनी शिबिरात सुरू असलेल्या विविध उपक्रमाची माहिती उपस्थितांना सांगितली. श्रमसंस्कारायाशिवाय पर्याय नाही कारण श्रमाने आयुष्याला दिशा मिळते, श्रमामुळे व्यक्ती आयुष्यात हवी ती प्रगती करून घेऊ शकतो असे आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. धनंजय तळवनकर यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. प्रेरणा देशमुख यांनी केले तर आभार प्रदर्शन सुमित गावंडे यांनी केले. या कार्यक्रमासाठी ज्ञानगंगापूर गावचे सरपंच ज्ञानेश्वर महाले पाटील यांनी सुद्धा उपस्थित मंडळीला मार्गदर्शन केले. उपसरपंच संगीता सूर्यवंशी, पोलीस पाटील रामदास वानखडे, प्रतिष्ठित नागरिक अरुण महाराज महाले, शाळा समिती अध्यक्ष दीपक खराटे व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्व उपस्थित त्यांनी शिबिरासाठी आलेल्या सर्व रासेयो स्वयंसेवकांचे स्वागत केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता वाणिज्य विभागाच्या प्रा. कोमल काळे , विद्यार्थी गटप्रमुख प्रकाश शर्मा, श्री निवृत्ती चोपडे व सर्व रासेयो स्वयंसेवक व स्वयंसेविका यांनी मेहनत घेतली. अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रा. डॉ. मोहम्मद रागिब देशमुख यांनी दिली आहे.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण निश्चितच प्रेरणादायी: राम महाले



जनसंचलन/ खामगाव

स्थानिक विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचालित गो.से महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर दत्त ग्राम ज्ञानगंगापूर येथे सुरू आहे. या शिबिरा अंतर्गत जालना पंचायत समितीमध्ये कार्यरत असणारे उत्कृष्ट शिक्षक श्री. राम महाले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबद्दलची माहिती विद्यार्थ्यांना देत असताना या शैक्षणिक धोरणाचे फायदे समजावून सांगितले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांकरीता येणाऱ्या भविष्यकाळात प्रचंड मोठ्या संधी उपलब्ध होणार असून त्याचा सर्वकष फायदा सर्वांनी घेतला पाहिजे असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. प्रा. उमेश खंदारे यांनी आपल्या प्रास्ताविका मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची गरज ध्येय धोरणे व उद्दिष्टे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. येणारा काळ हा प्रचंड स्पर्धेचा असून जो व्यक्ती आपले ज्ञान अद्ययावत ठेवेल त्या व्यक्तीला आपल्या आयुष्याचे सोने करायला वेळ लागणार नाही असे यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषणात राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. दीपक नागरिक यांनी सांगितले. याप्रसंगी मुलींनी सुद्धा नवीन शैक्षणिक धोरणाची कास धरून आपला सर्वांगीण विकास करून घ्यावा व समाजाचा संतुलित विकास साधावा असे महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. नीता बोचे मॅडम यांनी सांगितले. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. काळे मॅडम, हरिष राऊत, प्रकाश शर्मा,गौरव धर्माळे व सर्व राष्ट्रीय स्वयंसेवक व स्वयंसेवका यांनीमेहनत घेतली. अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रा. डॉ. मोहम्मद रागिब देशमुख यांनी दिली आहे.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यावर फडणवीस स्पष्टच बोलले, मास्टरमाईड जर मंत्र्यांच्या एवढ्या जवळचा असेल तर...

**मुंबई :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुखांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला होता. यानंतर प्रकरणातील आरोपींवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. सीआयडीने याप्रकरणी दोषारोपपत्र दाखल केले आहे. यातून वाल्मिक कराडच याप्रकरणातील मास्टरमाईंड असल्याचे स्पष्ट झाले आहे. यातच देशमुखांच्या निर्घृण हत्येचे काही फोटो आणि व्हिडिओ माध्यमांसमोर आले. हे पाहून महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली. यावरुन विरोधकांनी सरकारला घेरले आणि धनंजय मुंडेंनी नैतिकतेच्या आधारावर तात्काळ राजीनामा द्यावा, असे पालुपद लावले आणि धनंजय मुंडेंनी राजीनामा दिलाही. त्यानंतर धनंजय मुंडेंनी आपण तब्येतीच्या कारणास्तव राजीनामा देत असल्याचे स्पष्ट केले. पण नक्की याच कारणामुळे की नैतिकतेच्या आधारावर राजीनामा दिला असे सवाल उपस्थित होऊ लागले आहेत. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी राजीनाम्याचे कारण स्पष्ट केले आहे. आयोजित एका कार्यक्रमात बोलताना देवेंद्र फडणवीसांनी संतोष देशमुख प्रकरण आणि मुंडेंचा राजीनामा यावर भाष्य केले आहे. फडणवीस म्हणाले, ज्यावेळी देशमुखांच्या हत्येची घटना घडली. ज्यावेळी याप्रकरणी मी सीआयडी चौकशी लावली. मी सीआयडीच्या लोकांना सांगितलं की यात कोणताही हस्तक्षेप नसणार. त्यांनी खूप चांगला तपास केला. तर फॉरेन्सिक टीमने जे मोबाईल हरवले होते. जो मोबाईट डाटा डिलिट केला होता. त्यामधील सगळा डाटा आधुनिक तंत्रज्ञानाने पुन्हा मिळवला. हत्येचे जे फोटो समोर आले आहेत. ते कोणीही शोधून काढलेले नाहीत. तो एक दोषारोपपत्राचा भाग म्हणून त्यात नमूद आहेत. आमचा तपासात काहीच हस्तक्षेप नव्हता. ज्यादिवशी दोषारोपपत्र दाखल झाले, तेव्हाच मला तपासाबद्दल माहिती मिळाली. उज्वल निकमांच्या सरकारी वकील म्हणून नियुक्तीला उशीर का झाला? यावर बोलताना फडणवीसांनी नमूद केले की, याला कारण आहे.



प्रॉशिक्युशनच्या नियमानुसार प्रॉशिक्युशन वकील हे दोषारोपपत्रात सहकार्य करुच शकत नाहीत. त्यामुळे ज्यावेळी दोषारोपपत्र दाखल झाले तेव्हाच त्यांची नियुक्ती केलीधनंजय मुंडेंच्या राजीनाम्याच्या कारणावर पहिल्यांदाच फडणवीसांनी भाष्य केले. धनंजय मुंडेंचा राजीनामा योग्यवेळी झाला की अयोग्यवेळी त्याच्या खोलात मी जाणार नाही. राजीनामा पहिल्या दिवशी घ्या किंवा शेवटच्या दिवशी लोकांना बोलायचंय ते बोलणारच. ज्याप्रकारे ही हत्या झाली आहे, हत्येचा जो मास्टरमाईंड आहे तोच जर मंत्र्यांच्या एवढ्या जवळचा असेल तर त्या मंत्र्यांने नैतिकतेच्या आधारावर राजीनामा द्यायला हवा.आता युती आहे तर राजीनामा घेण्यास वेळ लागतो पण या परिस्थितीला खंबीरपणे सामोरं गेलं आहोत. त्यानंतर त्यांनी राजीनामा दिला आहे. असे फडणवीसांनी स्पष्ट केले.

# अमेरिकेच्या १५ लाख घरांची बत्ती गुल करु! ट्रम्प यांना थेट प्रत्युत्तर, आरपारचा पवित्रा...

**ओटावा:** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून जगभरातील अनेक देशांना वाढीव कर लावण्याचे इशारे दिले जात आहेत. त्यांच्या इशाऱ्यांना आता वाढता विरोध होऊ लागला आहे. विशेष म्हणजे अमेरिकेतही ट्रम्प यांना विरोध सहन करावा लागत आहे. अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेत प्राण फुंकण्यासाठी ट्रम्प यांनी टॅरिफचा डाव टाकला. पण आता तो अमेरिकेवरच भारी पडताना दिसत आहे. अमेरिका महाशक्ती असली, तरीही ज्या पद्धतीनं ट्रम्प यांनी चीन, कॅनडा, मेक्सिकोसारख्या देशांवर टॅरिफ लादलं आहे, त्याच पद्धतीनं या देशांनी अमेरिकेला प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केली आहे. मेक्सिको आणि कॅनडावर २५ टक्के टॅरिफ लागू करण्याची घोषणा डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी केली. मंगळवारपासून घोषणेची अंमलबजावणी होईल. त्यात कोणताही उशीर होणार नाही, असं ट्रम्प म्हणाले. यानंतर कॅनडात संतापाची भावना आहे. कॅनडानं आर्थिक आघाडीवर अमेरिकेविरोधात आरपारचा पवित्रा घेतला आहे.ऊर्जा आयात वगळता कॅनडाहून येणाऱ्या सगळ्या वस्तूंवर ट्रम्प यांनी २५ टक्के कर लावण्याची घोषणा केली आहे. त्यानंतर पलटवार करत कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी ३० अब्ज कॅनडियन डॉलर किमतीच्या अमेरिकन आयातीवर टॅरिफ लागू केला. कॅनडानंही अमेरिकेच्या उत्पादनांवर २५ टक्क्यांचा अतिरिक्त




सरचार्ज लावला आहे. यासोबत ट्रुडो यांनी ट्रम्प यांच्यावर तिखट हल्ला चढवला आहे. ट्रम्प कॅनडाची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त करत असल्याचा गंभीर आरोप ट्रुडो यांनी केला आहे.यादरम्यान कॅनडाच्या ओंटारिया प्रांताचे प्रीमियर डग फोर्ड यांनी अमेरिकेवर जबरदस्त पलटवार केला आहे. त्यांनी अमेरिकेला बत्ती गुल करण्याची धमकी दिली आहे. कॅनडाच्या ओंटारियो प्रांतातून अमेरिकेच्या ३ राज्यांना वीज पुरवठा केला जातो. अमेरिकेच्या मिनिसोटा, मिशिगन, न्यूयॉर्कमधील जवळपास १५ लाख घरांना ओंटारियोमधून वीज पुरवठा होतो. कॅनडा अमेरिकेला वीज निर्यात करतो. ओंटारियो प्रांताची सीमा अमेरिकेला लागून आहे. याशिवाय कॅनडानं अमेरिकेला निकेल पुरवठा करण्याचीही धमकी दिली आहे. डग फोर्ड यांनी आधीही अमेरिकेला बत्ती गुल करण्याची धमकी दिली होती.

# भारताबरोबर न्यूझीलंड फायनलमध्ये भिडणार

**लाहोर :** न्यूझीलंडने क्रिकेट विश्वातील आपला दरारा कायम राखत अखेर चॅम्पियन्स ट्रॉफीची फायनल गाठली आहे. न्यूझीलंडचा फायनलमध्ये सामना आता भारताशी होणार आहे. न्यूझीलंडने सेमी फायनलमध्ये दक्षिण आफ्रिकेवर दणदणीत विजय साकारला आणि फायनलमध्ये प्रवेश केला. न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करताना ३६२ धावांचा डोंगर उभारला होता. पण या आव्हानाचा पाठलाग करणाऱ्या दक्षिण आफ्रिकेवर न्यूझीलंडने अंकुश लावला आणि हा ५० धावांनी सामना जिंकला. डेव्हिड मिलरने अखेरच्या षटकांत तुफानी फटकेबाजी करत नाबाद १०० धावांची खेळी साकारली खरी, पण तोपर्यंत दक्षिण आफ्रिकेचा संघ पराभवाच्या वाटेवर निघालेला होता. न्यूझीलंडच्या विजयाचा पाया रचला तो रचिन रवींद्र आणि केन विल्यम्सन यांनी. कारण या दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी शतकी भागदारी रचली आणि संघाला सहजपणे २०० धावांचा टप्पा ओलांडून दिला. रचिनने सुरुवातीला आक्रमक खेळ करत जोरदार फटकेबाजी केली आणि प्रथम शतक झळकावले. पण शतक झळकावल्यावर तो जास्त काळ टिकू शकला नाही. राचिन रवींद्रने यावेळी १३ चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर १०८ धावांची खेळी साकारली. राचिन बाद झाला आणि त्यानंतर केनने आपल्या खांद्यावर संघाची सर्व जबाबदारी उचलली. केनच्या खेळात यावेळी चांगलीच आक्रमकता दिसली. केननेही यावेळी आपले शतक साजरे केले. पण तोदेखील त्यानंतर जास्त धावा करू शकला नाही. केनने यावेळी ९४ चेंडूंत १० चौकार आणि दोन षटकारांच्या जोरावर १०२ धावा केल्या. डॅरिल मिचेल आणि ग्लेन फिलीप्स यांनी अखेरच्या षटकांमध्ये धमाकेदार फटकेबाजी केली आणि त्यामुळेच न्यूझीलंडला २६२ धावांचा पल्ला गाठता आला.दक्षिण आफ्रिकेला हेन्रीच क्लासिन आणि एडन मार्करम यांच्याकडून मोठी आशा होती. पण हे दोघे लौकिकाला साजेशी फलंदाजी करू शकले नाही. डेव्हिड मिलरने संघाचा किल्ला लढवण्याचा प्रयत्न केला खरा, पण त्याला संघाला सामना जिंकवून देण्यात अपयश आले. त्यामुळे न्यूझीलंडचा संघ आता चॅम्पियन्स ट्रॉफीच्या फायनलमध्ये दाखल झाला आहे आणि त्यांना आता भारताचा सामना करावा लागणार आहे.भारत आणि न्यूझीलंड यांच्यामध्ये यापूर्वीही सामना झाला होता. त्या सामन्यात भारताने न्यूझीलंडवर बाजी मारली होती.

## मी आणखी काय करु शकतो?... विजयी षटकार मारुनही राहुल निराश; संघातील स्थानाबद्दल बोलताना भावूक...



**दुबई:** भारताचा यष्टीरक्षक-फलंदाज केएल राहुलने मंगळवारी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या उपांत्य सामन्यात ३४ चेंडूत ४२* धावांची महत्वपूर्ण खेळी केली. त्याच्या खेळीमुळे भारताला कठीण लक्ष्याचा पाठलाग करण्यास मदत झाली. यासह, भारत आता चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम फेरीत पोहोचला आहे. सामन्यानंतर, राहुलने भारतीय संघातील त्याचे स्थान, त्याची असुरक्षितता आणि सोशल मीडियावरील ट्रोलर्सकडून होणाऱ्या टीकेबद्दल आपले विचार मांडले. केएल राहुल म्हणाला, ङ्कमी ऑस्ट्रेलियामध्ये कसोटी सामन्यांमध्ये सलामी देत होतो आणि तुम्हाला माहिती आहेच की त्या चेंडूंचा सामना करणे किती कठीण असते. तिथून येणे आणि मधल्या फळीत फलंदाजी करणे थोडे वेगळे आहे. पण मला काही तक्रार नाही. मी गेल्या ४-५ वर्षांपासून अशाच प्रकारे पांढऱ्या चेंडूचे क्रिकेट खेळत आहे. मला क्रमाने वर-खाली जाण्याची सवय आहे. मला जिथे खेळायला सांगितले जाते तिथे खेळण्यास मी आनंदी आहे आणि त्यामुळे मला माझा खेळ अधिक चांगल्या प्रकारे समजण्यास मदत झाली आहे. गेल्या एका वर्षात माझे बाउंड्री मारण्याचे कौशल्य सुधारण्यासही यामुळे मदत झाली आहे.केएल राहुल पुढे म्हणाला,२०२० पासून मी ५ व्या क्रमांकावर फलंदाजी करत आहे. लोक विसरतात की मी इथे खेळतोय. जेव्हा जेव्हा मी मालिकेत कामगिरी करतो आणि एकदिवसीय क्रिकेटमधून ब्रेक घेतो, तेव्हा पुढची मालिका येते तेव्हा प्रश्न पडतो की, तो प्लेइंग इलेव्हनमध्ये कुठे खेळेल? असे प्रश्न निर्माण होऊ लागतात. कधीकधी, मी ड्रेसिंग रूममध्ये बसतो आणि विचार करतो, मी आणखी काय करू शकतो? मला जिथे जिथे खेळायला सांगितले गेले आहे, तिथे मी खेळलो आहे आणि मला वाटते की रोहितने मला जे करायला सांगितले आहे त्यानुसार मी चांगली कामगिरी केली आहे.यष्टीरक्षक-फलंदाज पुढे म्हणाला, ङ्करोहितने मला साथ दिली आहे, मला पाठिंबा दिला आहे आणि कर्णधाराचा तो आत्मविश्वास अमूल्य आहे. मला फक्त फलंदाजी करायला आवडते. ३० चेंडू फलंदाजी करणे देखील मजेदार आहे. त्यातही दबाव असतो - एक चुकीचा फटका बसला तर तुम्ही संघाला निराश करू शकता. तुम्हाला ते नेहमीच नको असेल, पण त्यात उत्साह आहे.

## सामना जिंकताच भारताला मिळाली गुडन्यूज, फायनलपूर्वी विराटची मोठी झेप...



**दुबई:** भारतविरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यात सेमी फायनल सामना रंगला ज्यात भारताने विजय मिळवला. या सामन्यातील विजयानंतर भारताला थेट पायनलचे तिकीट मिळाले. फायनलपूर्वी भारताला एक मोठी गुडन्यूज मिळाली आहे. ही गुडन्यूज विराट कोहलीसंदर्भात आहे. आयसीसीने बुधवारी ताजी एकदिवसीय क्रमवारी जाहिर केली. टीम इंडियाचा अनुभवी खेळाडू विराट कोहलीला रँकिंगमध्ये फायदा झाला आहे. कोहलीने एका स्थानाने झेप घेतली आहे. श्रेयस अय्यरला फलंदाजीच्या क्रमवारीतही फायदा झाला आहे. टीम इंडियाने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. कोहलीने उपांत्य फेरीत चमकदार कामगिरी केली त्याचा रँकिंगमध्ये कोहलीला फायदा झाला आहे.आयसीसीच्या ताज्या एकदिवसीय क्रमवारीवर नजर टाकल्यास, शुभमन गिल फलंदाजांच्या यादीत अव्वल स्थानावर आहे. गिलला ७९१ रेटिंग मिळाले आहे. पाकिस्तानचा बाबर आझम दुसऱ्या क्रमांकावर कायम आहे. दक्षिण आफ्रिकेचा खेळाडू हेनरिक क्लासेनला एका स्थानाचा फायदा झाला आहे. तो तिसऱ्या क्रमांकावर आला आहे. कोहलीलाही एका स्थानाचा फायदा झाला आहे. कोहली आता चौथ्या क्रमांकावर आहे. त्याला ७४७ रेटिंग मिळाले आहे. रोहित शर्मा पाचव्या स्थानावर आहे.श्रेयस अय्यरने उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाविरुद्ध ४५ धावांची महत्त्वाची खेळी केली. याआधीही त्याने अनेक वेळा आपली जादू दाखवली आहे. याचा फायदा अय्यरला रँकिंगमध्ये मिळाला. तो आठव्या स्थानावर आला आहे. अय्यर एका स्थानाने वर आला आहे. जर आपण टॉप १० च्या यादीवर नजर टाकली तर त्यात भारतातील चार खेळाडू आहेत. शुभमन, कोहली, रोहित आणि अय्यर हे या यादीचा भाग आहेत.२०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये शमीने भारतासाठी चांगली गोलंदाजी केली आहे. स्पर्धेत सर्वाधिक विकेट्स घेण्याच्या बाबतीत तो सध्या अव्वल स्थानावर आहे. शमीने ४ सामन्यात ८ विकेट्स घेतल्या आहेत. त्याचा फायदा त्याला रँकिंगमध्ये झाला आहे. शमी एकदिवसीय गोलंदाजांच्या क्रमवारीत ११ व्या स्थानावर पोहोचला आहे. त्याला तीन स्थानांचा फायदा झाला आहे.

# लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधीपासून मिळणार? मंत्री आदिती तटकरे यांचं मोठं वक्तव्य...




**मुंबई :** विधान परिषदेत आज लाडक्या बहीण योजनेच्या मुद्द्यावरुन चर्चा सुरु असताना महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी महत्वाची माहिती दिली. विशेष म्हणजे विरोधकांनी लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधीपासून देणार? असा प्रश्न विचारला तेव्हा आदिती तटकरे यांनी महत्वाची प्रतिक्रिया दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येत्या अधिवेशन काळात किंवा अर्थसंकल्पात आपण लाडकी बहीण योजनेच्या पात्र महिलांना दर महिन्याला २१०० रुपयांची मदत घोषित करु, असं कोणतंही वक्तव्य केलेलं नाही, असं मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या. यावेळी विरोधकांनी महायुतीच्या जाहिरनाम्यात २१०० रुपयांचं आश्वासन दिलं होतं, अशी आठवण करुन दिली. त्यावरही आदिती तटकरे यांनी भाष्य केलं. जाहिरनामा हा पाच वर्षांसाठी असतो. या अर्थसंकल्पात २१०० करणार असं वक्तव्य कुठेही केलेलं नाही. पाच वर्षांसाठी जाहिरनामा केला जातो. मंत्रिमंडळ ज्यावेळेला सूचित करेल त्यावेळी तशा पद्धतीचा प्रस्ताव आम्ही शासनासमोर ठेवू, अशी प्रतिक्रिया आदिती तटकरे यांनी दिली.राज्यातील महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला प्रचंड प्रतिसाद दिला. या योजनेसाठी जुलै २०२४ पासून रजिस्ट्रेशन सुरु झालं, तेव्हापासून आतापर्यंत २ कोटी ६३ लाख अर्ज प्राप्त झाले. आम्ही ऑगस्ट महिन्यापासून अर्ज छाननीची प्रक्रिया सुरु केली. कारण १ जुलैपासून अर्ज भरण्यास सुरुवात झाली. जुलै-ऑगस्टमध्ये जितके अर्ज प्राप्त झाले त्याचवेळी १ लाख ९७ हजार महिला या संजीव गांधी निराधार योजनेचा लाभ घेत असल्याची माहिती आमच्या विभागाला मिळाली. त्या महिलांचे अर्ज आम्ही त्याचवेळी बाद केले, अशी माहिती आदिती तटकरे यांनी दिली.यानंतर सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात आम्हाला २ लाख ५४ हजार महिला या संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेत असल्याचा डेटा आम्हाला मिळाला. या महिलांना लाडकी बहीण योजनेतून वगळण्यात आलं. मधल्या कालावधीत ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर या कालावधीत आचारसंहिता होता. त्यामुळे अर्ज छाननीची प्रक्रिया बंद होती. तसेच प्रत्येक स्किमचा डेटा आम्ही इतर विभागाकडून मागवत असतो. जसा डेटा प्राप्त होत गेला तशी कारवाई करत गेलो, असं आदिती तटकरे यांनी सांगितलं.लाडक्या बहिणींच्या निकषात एकही बदल केलेला नाही. या निकषाला अनुसरुनच कारवाई करत आहेत. या व्यतिरिक्त स्थानिक जिल्हा पातळीवर तक्रारी मिळत गेल्या तशी कारवाई करत गेलो. परिवहन विभागाकडून जसा डेटा मिळत गेला त्यानुसार कारवाई करत गेलो, असंही त्यांनी सांगितलं.ही योजना २१ ते ६५ वयोगटातील महिलांना आहे. त्यामुळे लाभार्थ्यांच्या संख्येत बदल होत जाणार आहे. आता १ लाख २० हजार महिला या ६५ वर्षाच्या पुढे गेल्या आहेत. त्यामुळे त्या अपात्र होणार आहेत. काही महिला या विवाह होऊन इतर राज्यात जात असतात. स्थलांतरीत होत असतात. ही प्रक्रिया ऑनगोईंग आहे. आपण जवळपास अडीच कोटी महिलांना या योजनेचा लाभ पोहोचवत आहोत, असं आदिती तटकरे म्हणाल्या.

# अभिषेक बच्चन नेपोटिझमचा बळी ठरला, या ट्विटर पोस्टवर बिग बींनी व्यक्त केली खंत- एक वडील म्हणून...

**मुंबई:** ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन वयाच्या ८२व्या वर्षीदेखील विविध माध्यमांमधून प्रेक्षकांच्या भेटीला येतात. सिनेमा असो किंवा टेलिव्हिजन ते विशेष सक्रिय आहेत. याशिवाय ते सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या माध्यमातूनदेखील प्रेक्षकांशी संवाद साधतात. बिग बी एक्स या प्लॅटफॉर्मवर (पूर्वीचे ट्विटर) विशेष सक्रिय आहेत. क्रिकेट, सिनेमा, कुटुंबीय किंवा इतर कोणत्याही विषयावर त्यांचे दररोज एकतरी ट्वीट असतेच. मुलगा अभिषेक बच्चनविषयी आणि त्याच्या सिनेमांविषयी ते अनेकदा पोस्ट शेअर करतात. ४ मार्च रोजीदेखील त्यांनी



अभिषेकविषयी पोस्ट केली असून, त्याच्यावर झालेल्या अन्यायाविषयी बिग बींनी भाष्य केले. बिग अभिषेक नेपोटिझमपमचा बळी ठरला, याविषयी भाष्य करणारी एक पोस्ट एक्स प्लॅटफॉर्मवर शेअर करण्यात आलेली. अमिताभ यांनी हिच पोस्ट त्यांच्या प्रोफाइलवर रीट्विट केली आणि त्यावर एका ओळीचे कॅप्शन देत लक्ष वेधून घेतले.ट्विटरवर मनोरंजनविषयक पोस्ट शेअर करणाऱ्या एका पेजवरुन अशी पोस्ट करण्यात आलेली की, अभिषेक बच्चन विनाकारण नेपोटिझम नकारात्मकतेचा बळी ठरला, पण त्याच्या फिल्मोग्राफीमध्ये चांगल्या चित्रपटांचे प्रमाण खूप जास्त आहे. ही पोस्ट रीट्वीट करत अमिताभ यांनी लिहिले की, मलाही असेच वाटते... आणि केवळ त्याचे वडील म्हणून मला असे वाटते असे नाही. नेपोटिझम या विषयावर भाष्य करणारी पोस्ट अमिताभ यांनी शेअर केल्याने, त्याची विशेष चर्चा झाली. अमिताभ यांच्या कमेंटवर असंख्य कमेंटही आल्या आहेत. आणखी एका ट्वीटमध्ये अमिताभ यांनी अभिषेकच्या आगामी चित्रपटाचा ट्रेलर शेअर केला आहे. अभिषेक बी हॅप्पी या सिनेमात महत्त्वाची भूमिका साकारत असून त्याविषयी पोस्ट शेअरता बिग बी म्हणाले की, अभिषेक, तू विलक्षण आहेस. तू प्रत्येक चित्रपटातील पात्राशी कसे जुळवून घेतो आणि त्यानुसार बदलतोस ही एक कला आहे, जी अविश्वसनीय आहे. लव्ह यू भय्यू. अभिषेकचे कौतुक करणाऱ्या इतरही काही पोस्ट त्यांनी सोशल मीडियावर शेअर केल्या होत्या. ज्युनिअर बच्चनच्या कामाबद्दल सांगायचे झाल्यास तो अलिकडच्या काळात आय वॉन्ट टू टॉक, घूमर, दसवी, लुडो या चित्रपटांमध्ये दिसला होता.

## भारताविरुद्ध पराभवाचा धक्का असह्य; ऑस्ट्रेलियाला मोठा झटका, स्टीव्ह स्मिथ वनडेतून निवृत्त....

**मुंबई:** २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीमधील ऑस्ट्रेलिया संघाचा प्रवास संपला आहे. उपांत्य सामन्यात भारताविरुद्ध त्यांना ४ विकेट्सने पराभव पत्करावा लागला. या पराभवानंतर संघाचा कर्णधार स्टीव्ह स्मिथने मोठी घोषणा केली आहे. स्टीव्ह स्मिथने एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. स्टीव्ह स्मिथ कसोटी आणि टी-२० स्वरूपात खेळत राहील. स्टीव्ह स्मिथने ऑस्ट्रेलियाकडून जवळजवळ १५ वर्षे एकदिवसीय क्रिकेट खेळले. या काळात त्याने अनेक वेळा संघाचे नेतृत्वही केले. २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्येही पॅट कमिन्सच्या अनुपस्थितीत ऑस्ट्रेलियाने त्याच्यावर विश्वास दाखवला.चॅम्पियन्स ट्रॉफीच्या उपांत्य फेरीतील पराभवानंतर ३५ वर्षीय स्टीव्ह स्मिथने त्याच्या संघातील सहकाऱ्यांना त्याच्या निर्णयाची माहिती दिली. स्टीव्ह स्मिथ म्हणाला, ङ्गङ्गहा एक अद्भुत प्रवास होता आणि मी त्यातील प्रत्येक क्षणाचा आनंद घेतला. खूप छान क्षण आणि अद्भुत आठवणी आहेत. दोन विश्वचषक जिंकणे ही एक मोठी कामगिरी होती आणि हा प्रवास शेअर करण्यासाठी अनेक अद्भुत सहकारी होते. २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकाची तयारी सुरू करण्याची ही एक उत्तम संधी आहे, त्यामुळे हीच योग्य वेळ वाटते.फफ्स्टीव्ह स्मिथ पुढे म्हणाला, ङ्गङ्ग कसोटी क्रिकेट




अजूनही प्राधान्य आहे आणि मी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनलमध्ये, हिवाळ्यात वेस्ट इंडिजमध्ये आणि नंतर घरच्या मैदानावर इंग्लंडविरुद्ध खेळण्यास उत्सुक आहे. मला वाटते की त्या व्यासपीठावर मला अजूनही खूप काही योगदान द्यायचे आहे.फफ्स्टीव्ह स्मिथने २०१० मध्ये एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. या काळात त्याने ऑस्ट्रेलियासाठी एकूण १७० एकदिवसीय सामने खेळले. एकदिवसीय सामन्यांमध्ये त्याने ४३.२८ च्या सरासरीने ५८०० धावा केल्या, ज्यामध्ये ३५ अर्धशतके आणि १२ शतके समाविष्ट आहेत. तो त्याच्या देशासाठी सर्वाधिक एकदिवसीय धावा करणारा १६वा आणि १२वा खेळाडू आहे. त्याच वेळी, टीम इंडियाविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यातही त्याची कामगिरी चांगली होती. स्मिथने भारताविरुद्ध ३० एकदिवसीय सामने खेळले आणि ५३.१९ च्या सरासरीने १३८३ धावा केल्या. ज्यामध्ये ७ अर्धशतके आणि ५ शतके देखील समाविष्ट आहेत

## सोने तस्करी प्रकरणी अटक झाल्यानंतर साऊथ स्टारचा भलताच दावा

**मुंबई:** कन्नड चित्रपट स्टार रान्या रावला मंगळवार, ४ मार्च रोजी सोन्याच्या तस्करी प्रकरणात अटक करण्यात आली. तिला बंगळुरू आंतरराष्ट्रीय विमानतळावर अटक करण्यात आली. अटकेनंतर आता रान्या रावने एक धक्कादायक दावा केला असून, चौकशीदरम्यान तिने पोलिसांना



सांगितले की तिला सोन्याची तस्करी करण्यासाठी ब्लॅकमेल करण्यात आले होते. याप्रकरणी पोलिसांनी कॉन्स्टेबल बसवराजू यांनाही ताब्यात घेतले आणि विमानतळावर अभिनेत्रीला मदत करण्यामध्ये त्यांचा हात असल्याचे जबाबात नोंदवण्यात आले आहे. रान्याला अटक केल्यानंतर पोलिसांनी तिच्या घरावर छापा टाकला होता. यामध्ये पोलिसांनी २.६७ कोटी रुपयांची रोखरक्कम आणि २.०६ कोटी रुपयांचे सोने जप्त केले. छाप्यादरम्यान, पोलिसांनी रान्याच्या घरातून तीन मोठे बॉक्स देखील जप्त केले, त्यानंतर जप्तीची एकूण किंमत १७.२९ कोटी रुपये झाली होती.रान्या बंगळुरूमधील केआयए विमानतळावर (कॅम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळ) उतरताच, तिने पोलीस कॉन्स्टेबल बसवराजूच्या मदतीने सुरक्षा तपासणी चुकवून तिथून निसटण्याचा प्रयत्न केला. पण डीआरआय तिच्या हालचालींवर लक्ष ठेवून होते. गेल्या १५ दिवसांत चार वेळा दुबईला गेल्याने ती डीआरआयच्या रडारवर आली होती.रान्या राव एअरपोर्ट सुरक्षा तपासणीच्या ठिकाणाहून निसटण्याचा प्रयत्न करत असताना डीआरआयने तिला रंगेहाथ पकडले. अधिकाऱ्यांनी अभिनेत्रीच्या जॅकेटमधून १२.५६ कोटी रुपयांचे १४.२ किलो सोने जप्त केले. तिने जॅकेटमध्ये सोन्याचे बार लपवले होते. सोने जप्त केल्यानंतर रान्याला अटक करण्यात आली आणि पुढील चौकशीसाठी नागावरा येथील डीआरआय कार्यालयात नेण्यात आले.रान्या रावच्या कारकिर्दीबद्दल बोलायचे झाले तर तिने कन्नड आणि तामिळ चित्रपटांमध्ये काम केले आहे. ती कर्नाटक राज्य पोलीस गृहनिर्माण महामंडळाचे डीजीपी रामचंद्र राव यांची सावत्र मुलगी आहे. रान्या रावला आता १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. डीआरआयचे अधिकारी याप्रकरणी तपास करत आहेत की, सोन्याच्या तस्करीमध्ये अभिनेत्रीचा एकटीचा सहभाग होता की, ती एखाद्या बड्या तस्करी टोळीशी संबंधित आहे.

# संतोष देशमुख यांच्या मारहाणीचे फोटो पाहून व्यथित तरुणाचं टोकाचं पाऊल, धनंजय देशमुखांची तरुणांना भावनिक साद...

**बीड :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचं नोव्हेंबर २०२४ मध्ये आधी अपहरण आणि नंतर त्यांची निर्घृण, अमानुषरित्या हत्या करण्यात आली. या घटनेनंतर केवळ बीडमध्येच नाही, तर संपूर्ण राज्यात संताप केला जात आहे. त्यानंतर संतोष देशमुख यांच्या हत्येला जवळपास ८० हून अधिक दिवस उलटून गेल्यानंतर ३ मार्च रोजी त्यांची हत्या करताचे आरोपींचे फोटो, संतोष देशमुख यांना अमानुषपणे मारहाण केल्याचे फोटो समोर आले. हे फोटो पाहून प्रत्येकजण हळहळला. संतोष भैय्या देशमुख यांना इतक्या क्रूरपणे मारहाण केल्यानंतरचे फोटो फोटो पाहून एका तरुणाला मोठा धक्का बसला. याच धक्क्यातून त्याने टोकाचं पाऊल उचललं. बीडच्या केज तालुक्यातील जानेगाव



येथे अशोक हरिभाऊ शिंदे, या २३ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. संतोष देशमुख प्रकरणातील दोषारोप पत्रातील वायरल झालेले फोटो पाहून केज तालुक्यातील जानेगाव येथील अशोक शिंदे हा तरुण प्रचंड अस्वस्थ, व्यथित झाला होता. त्याने या विषयावर गावातील मित्रांसोबत चर्चा केली. त्यानंतर तो घरी आला.तसंच त्याने घरी येऊन आपल्या पुण्यात राहणाऱ्या बहिणीशी फोनवरही याबाबत चर्चा करुन संतोष देशमुख यांच्या फोटोवरुन हळहळ व्यक्त केली होती. मला टोकाचं पाऊल उचलावसं वाटत आहे असं तो बहिणीला फोनवर म्हणाला होता. मित्रांना घरी जाऊन येतो असं सांगून तो घरी आला, नंतर बहिणीशी बोलला आणि घरातच गळफास लावून आपली त्याने आपली जीवन यात्रा संपवली.हत्येच्या निषेधार्थ आणि संतोष भैय्यांच्या आठवणीत काल जानेगाव बंद ठेवण्यात आलं होतं. यावेळी आत्महत्या केलेला अशोक शिंदे हा गाव बंद करण्यासाठी आग्रही होता. अशोक शिंदे यांची ही आत्महत्या नसून धनंजय मुंडेच्या गुन्हेगारी टोळीने केलेली हत्याच आहे, गुन्हेगारांचं क्रौर्य आणि संतोष देशमुख यांना झालेल्या यातना पाहूनच अशोक शिंदे विचलित झाला होता, त्यामुळे ही आत्महत्या नसून हत्याचं असल्याच्या संतप्त भावना सोशल मीडियावर व्यक्त केल्या जात आहेत.दरम्यान, ही घटना उघडकीस आल्याने खळबळ उडाली असून अशा पद्धतीने कोणीही आत्महत्येचं टोकाचं पाऊल उचलू नका, असं आवाहन संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांनी केलं आहे. तसंच एक - एक मावळा जर या लढाईमध्ये कमी होत असेल, तर लढाई लढायची कशी? असा प्रश्न देखील धनंजय देशमुख यांनी उपस्थित केला आहे

## कराड कनेक्शनमुळे मुंडे गोत्यात, अजित पवार सावध; मंत्री, आमदारांना मोलाचा सल्ला....

**मुंबई:** तब्बल २३० पेक्षा अधिक जागा निवडून आणत महायुतीनं राज्यातील सत्ता राखली. पण पहिल्याच महिन्यात महायुती सरकार सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे प्रचंड अडचणीत आलं. जवळपास ३ महिन्यांपासून देशमुख यांच्या हत्येचा विषय चर्चेत आहे. या प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडेंना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला.

त्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसनं सावध पवित्र घेतला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मंत्री माणिकराव कोकाटेदेखील अडचणीत आले आहेत. त्यामुळे सध्याची परिस्थिती बघता उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी पक्षाच्या सगळ्या आमदार, मंत्र्यांची बैठक बोलावत त्यांना मोलाचे सल्ले दिले. बीडच्या केजमधील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबरला अतिशय निर्घृणपणे हत्या करण्यात आली. त्या प्रकरणातील फोटो मंगळवारी (३ मार्चला) समोर आले.

त्यानंतर मंत्री धनंजय मुंडेंनी दुसऱ्याच दिवशीच राजीनामा दिला. त्यांच्याकडे अन्न आणि नागरी पुरवठा विभागाची जबाबदारी होती. देशमुख हत्या प्रकरणात मुंडे यांचा निकटवर्तीय असलेला वाल्मिक कराड क्रमांक एकचा आरोपी आहे. तोच या कटातला प्रमुख सूत्रधार आहे.अजित पवारांनी बोलावलेल्या बैठकीला पक्षाचे सगळे आमदार, मंत्री, नेते उपस्थित होते. धनंजय मुंडेदेखील बैठकीला हजर होते. मुंडे यांच्या राजीनाम्याचा संदर्भ देत पवार यांनी वाल्मिक कराडचं उदाहरण दिलं.

कराडसोबतच्या कनेक्शनमुळे मुंडेंना राजीनामा द्यावा लागला. त्यामुळे आमदार आणि मंत्र्यांनी राजकीय कामं करताना कार्यकर्त्यांवर पूर्णपणे अवलंबून राहू नये, असा सल्ला अजित पवारांनी दिला.

# सावधान, कलिंगडाच्या खोट्या रंगावर विश्वास ठेवून द्याल मृत्यूला आमंत्रण, या ट्रिकने ओळखा नॅचरली पिकलेले लालेलाल फळ...

उन्हाळा आला की बाजारात कलिंगडांची आवक मोठ्या प्रमाणावर वाढते. गोडसर, रसाळ आणि थंडावा देणारे कलिंगड खाण्याचा आनंद काही औरच असतो. मात्र, योग्यरित्या पिकलेले आणि नैसर्गिकरीत्या गोडसर कलिंगड ओळखणे अनेकांसाठी कठीण जाते. काही वेळा कलिंगड आतून कच्चे, गोडसर नसलेले किंवा फारच पाणचट निघते. त्यामुळे बाजारातून कलिंगड घेताना कोणत्या गोष्टी लक्षात ठेवाव्यात, हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. चला तर मग, जाणून घेऊया पिकलेले आणि स्वादिष्ट कलिंगड कसे ओळखावे याचे सोपे आणि खात्रीशीर उपाय.

### कलिंगडाचा रंग आणि पोत

कलिंगड निवडताना त्याचा रंग आणि पोत पाहणे अत्यंत आवश्यक आहे. नैसर्गिकरीत्या पिकलेले कलिंगड गडद हिरव्या रंगाचे आणि त्याच्या सालीवर हलक्या रेघा किंवा डाग असतात. जर कलिंगडाचे बाह्यसर रूप खूप चमकदार असेल, तर ते पूर्णपणे पिकलेले नसेल. तसेच, त्याचे कवच किंचित खरडल्यास पांढरट किंवा पिवळसर भाग दिसला तर ते कलिंगड योग्य प्रकारे पिकलेले असते.

### तळाचा पिवळसर डाग

पिकलेल्या कलिंगडाच्या तळाच्या बाजूला एक मोठा पिवळसर डाग असतो. हा डाग कलिंगड जमीनीवर वाढत असताना तयार होतो आणि जितका हा डाग गडद पिवळसर असेल, तितके कलिंगड गोडसर आणि रसाळ असते. जर हा डाग पांढरट किंवा अगदीच फिकट असेल, तर कलिंगड कच्चे असण्याची शक्यता असते. त्यामुळे कलिंगड खरेदी करताना हा भाग नीट पाहावा.

### बोटांनी कलिंगड टॅप करून आवाज ऐका

कलिंगडाच्या गोडसरपणाची आणि रसाळपणाची खात्री करण्यासाठी त्यावर हलक्या हाताने टॅप करून आतून येणारा आवाज ऐकणे हा एक जुना आणि प्रभावी उपाय आहे. जर कलिंगड टॅप केल्यावर ठणठणीत आणि आतून रिकामा असल्यासारखा आवाज आला, तर ते पूर्णपणे पिकलेले आणि गोडसर असते. जर आवाज जडसर वाटला तर कलिंगड आतून कच्चे किंवा फारच पाणचट असण्याची शक्यता असते.



### वजन आणि आकार तपासा

पिकलेले आणि गोडसर कलिंगड नेहमीच त्याच्या आकाराच्या तुलनेत जड वाटते. जेव्हा तुम्ही दोन समान आकाराची कलिंगडे उचलता, तेव्हा वजनाने जड असलेले कलिंगड जास्त गोडसर आणि रसाळ असण्याची शक्यता असते. तसेच, अगदी मोठ्या किंवा अगदी लहान आकाराच्या कलिंगडांपेक्षा मध्यम आकाराचे आणि प्रमाणबद्ध गोलसर किंवा किंचित लांबट कलिंगड अधिक चांगले असते.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते ऑस्ट्रेलिया-भारत क्रीडा उत्कृष्टता मंचचे उद्घाटन

जनसंचलन/बुलढाणा

भारत-ऑस्ट्रेलिया देशांमधील क्रीडा क्षेत्रातील सहकार्य वृद्धींगत करण्याच्या दृष्टीने केंद्रीय युवा कार्यक्रम आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा निखिल खडसे यांच्या हस्ते गुजरातमधील गीफ्ट सिटीमध्ये ङ्गऑस्ट्रेलिया-भारत क्रीडा उत्कृष्टता मंचफ्चे उद्घाटन बुधवारी करण्यात आले. दोन देशांमधील क्रीडा सहकार्य वाढवून क्रीडा क्षेत्रातील गुणवान खेळाडूंचा शोध आणि विकास, स्पर्धा आयोजन, सर्व समावेशकता, खाजगी क्षेत्राची भूमिका, शिक्षण व क्रीडा विज्ञान यांची भूमिका तसेच क्रीडा क्षेत्रातील व्यापार, पर्यटन आणि गुंतवणुकीला चालना देणे हे या मंचचे मुख्य उद्देश आहे. केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी भारत आणि ऑस्ट्रेलियातील क्रीडा क्षेत्रातील वाढत्या सहकार्यावर भर दिला, विशेषत: क्रिकेट आणि हॉकी खेळासह इतर खेळांमध्ये खासगी क्षेत्राची गुंतवणूक, क्रीडा विज्ञान आणि क्रीडा उद्योगातील व्यापार हे परस्पर संबंधाचे मुख्य क्षेत्र आहेत, असे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, क्रीडा क्षेत्राबद्दल असलेली आवड हा भारत आणि ऑस्ट्रेलिया यांना जोडणारा समान धागा आहे. या ऐतिहासिक मंचाच्या माध्यमातून आम्ही क्रीडा क्षेत्रातील संवादांना क्रिकेट आणि हॉकी खेळाच्या पलीकडे नेण्याचा प्रयत्न करत आहोत, ज्याद्वारे क्रीडा संरचना




आणि क्रीडा उद्योगातील गुंतवणूक यांच्या वाढीस चालना मिळेल. प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या दूरदृष्टीने क्रीडा क्षेत्राला सामर्थ्यवान करण्यासाठी आम्ही क्रीडा स्पर्धांचे आयोजन, टॉप्स, फिट इंडिया आणि अस्मिता सारख्या उपक्रमांच्या माध्यमातून, आम्ही कार्य करत आहोत,फ्फ्असे त्या म्हणाल्या. या मंचाद्वारे ऑस्ट्रेलियाच्या क्रीडा क्षेत्राच्या विकासातील कल्पनांचा उपयोग करून भारताला सर्वोत्तम ओळख मिळणार आहे. २०३६ ऑलंपिक आणि पॅरालंपिक गेम्सच्या आयोजनावर द्विपक्षीय देशांमध्ये आदान-प्रदान करून भारतीय आणि ऑस्ट्रेलियन क्रीडा संस्थांमधील संबंध मजबूत करणे, क्रीडा उद्योगातील खासगी गुंतवणूक आणि व्यापाराला प्रोत्साहन देणे, क्रीडा विज्ञान व तंत्रज्ञानाद्वारे खेळाडूंच्या कार्यक्षमतेत वृद्धी करणे आणि भविष्यातील क्रीडा धोरण तयार करण्यावर भर दिला जाणार आहे, असेही त्या म्हणाल्या. गुजरात राज्याचा क्रीडा संरचनांच्या दृष्टीकोनातून वाढता प्रभाव भारताला क्रीडा महासत्तेच्या मार्गावर गतिल करेल. आदान-प्रदानामुळे मोठ्या भागीदारींतून क्रीडा संस्कृतीचा विकास होऊन भारत जागतिक क्रीडा शक्ती बनेल, असा विश्वास केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी व्यक्त केला ऑस्ट्रेलिया-भारत क्रीडा उत्कृष्टता मंच भारताच्या क्रीडा क्षेत्रातील सक्षम व स्पर्धात्मक वातावरण निर्माण करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, ज्यामध्ये ऑस्ट्रेलिया एक महत्त्वाचा धोरणात्मक भागीदार ठरेल. ज्यामध्ये ऑस्ट्रेलियाभारत क्रीडा संस्थांमधील संबंध वाढविणे आणि भारताच्या क्रीडा, उच्च शिक्षणाच्या संबंधित बाबींवर दीर्घकालीन धोरणांचा समावेश होणार आहे. ऑस्ट्रेलियाभारत क्रीडा उत्कृष्टता मंचाच्या उद्घाटन समारंभाला ऑस्ट्रेलियाचे भारतातील उच्चायुक्त फिलिप ग्रीन, गुजरात राज्याचे क्रीडा व सांस्कृतिक कार्य मंत्री हर्ष संघवी आणि ऑस्ट्रेलियातील क्रीडा आणि उच्च शिक्षण संस्थांचे प्रतिनिधी आणि उद्योग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# मुख्यमंत्री तिर्थदर्शन योजनेंतर्गत अयोध्या दर्शनाचे नियोजन

## जेष्ठ नागरिकांनी सक्षम वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करण्याचे आवाहन

जनसंचलन/ जळगाव जा

मुख्यमंत्री तिर्थदर्शन योजनेंतर्गत जिल्हातील ८०० जेष्ठ नागरिकांना श्रीराम मंदिर अयोध्या(उत्तरप्रदेश) या तिर्थस्थळी ने-आण करण्यासाठी दि. ७ ते ११ मार्च २०२५ या कालावधीत नियोजन करण्यात आले आहे. या तिर्थस्थळ दर्शनाकरीता पात्र असलेल्या जेष्ठ नागरिकांनी शारीरिकदृष्ट्या सक्षम असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करण्याचे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त भाऊराव रामसिंग चव्हाण यांनी केले आहे. श्रीराम मंदिर अयोध्या तिर्थस्थळी जाणाऱ्या पात्राधारक जेष्ठ नागरिकांनी सामान्य रुग्णालय तसेच तालुकास्तरावरील आरोग्य यंत्रणाकडून वैद्यकीय तपासणी करुन त्याबाबतचे प्रमाणपत्र समाजकल्याण कार्यालयाकडे सादर करावे. तसेच प्रवासाकरीता जाण्याची तारीख व वेळ लाभार्थ्यांना यथावकाश दुरध्वनीव्दारे कळविण्यात येईल, अशी माहिती प्रसिद्धी पत्रकाव्दारे सहायक आयुक्त यांनी कळविले आहे.

# सोमवारी डाक अदालतीचे आयोजन

जनसंचलन/ देऊळगाव राजा

पोस्ट विभागाच्या तक्रारी सोडविण्यासाठी बुलडाणा डाकघर विभागातर्फे सोमवार, दि. १० मार्च २०२५ रोजी सकाळी ११ वाजता डाक अदालत आयोजित करण्यात आले आहे. पोस्टाच्या कार्याविषयी किंवा कामकाजाबद्दल सहा आठवड्यात तक्रारींचे निवारण झालेले नसल्यास अशा तक्रारींची दखल डाक अदालतीमध्ये घेतल्या जाणार आहे. देशातील पोस्टाची सेवा ही सामाजिक आणि आर्थिक जीवनाचा एक अभिन्न भाग आहे. देशातील प्रत्येक नागरिकांच्या मनामध्ये पोस्टाच्या सेवेने वेगळ्या प्रकारचे स्थान निर्माण केले आहे. पोस्ट खाते हे लोकांना चांगल्या प्रकारची सेवा देण्याचा व ग्राहकांचे जास्तीत जास्त समाधान करण्याचा प्रयत्न करते. ही सेवा देताना संभाषण, पत्रव्यवहार किंवा सेवेमध्धील काही त्रृटीमुळे पोस्टाच्या सेवेबद्दल तक्रारी होतात. तक्रारींचा योग्य प्रकारे न्याय निवडा करण्यासाठी पोस्ट खात्यातर्फे डाक अदालती घेण्यात येते. विशेषत: टपाल, स्पीड पोस्ट, डाक वस्तू पार्सल, बचत बँक आणि मनीऑर्डरबाबत तक्रारी विचारात घेतल्या जातील. तक्रारींचा उल्लेख सर्व तपशीलासह केलेला असावा. तक्रारीत तारीख आणि ज्या अधिकाऱ्यास मुळ तक्रार पाठविली त्याचे नाव आणि हुद्दा आदी संबधित माहिती डाक सेवेबाबत तक्रार डाकघर अधिक्षक गणेश आंभोरे, बुलडाणा विभाग, यांचे नावे दोन प्रतीत शुक्रवार, दि. ७ मार्च २०२५ पर्यंत पोहचेल, अशा रीतीने पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पी.एम.किसान एपीके लिंक उघडताच शेतकऱ्यांची बँक खाती होताहेत रिकामी

## फसव्या पीएम किसान ॲप्लीकेशन, लिंकपासून सावध रहा

जनसंचलन/बुलढाणा

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना कृषि विभागामार्फत राबविण्यात येत आहे. योजनेंतर्गत शेतकऱ्यांच्या मोबाईलवर पीएम किसान यादी किंवा पीएम किसान ॲप एपीके मॅसेजची लिंक उघडताच शेतकऱ्यांच्या बँक खात्यात असलेली रक्कम गायब होत असल्याचे निर्दे शनात आले आहे. शेतकऱ्यांनी फसव्या पीएम किसान एपीके ॲप्लीकेशन व लिंकपासून सावध राहावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे. शेतकऱ्यांनी मोबाईलवर पीएम किसान लिस्ट एपीके लिंक किंवा पीएम किसान एपीके संदेशाची लिंक उघडू नये किंवा सदर लिंकचा वापर शेतकऱ्यांनी करू नये. त्याऐवजी केंद्र शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या अधिकृत https://pmkisan.gov.in/ या पोर्टलचा वापर करावा. तसेच अशी काही घटना घडल्यास किंवा आढळून आल्यास त्वरित जवळच्या संबंधित सायबर पोलिसांकडे तक्रार नोंदवावी असे आवाहनही जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. ढगे यांनी केले आहे.



# आदित्य ठाकरे मुख्यमंत्री फडणवीसांच्या भेटीला, कारणही समोर...

**वृत्तसंस्था/मुंबई**

विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु असताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. गेल्या काही दिवसांपासून शिवसेना उबाठा आणि भारतीय जनता पक्षाची जवळीक वाढत आहे. हिवाळी अधिवेशनात उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरेंसह पक्षाच्या अन्य आमदारांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. आता अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु असताना आदित्य ठाकरेंनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. या भेटीचं कारण समोर आलं आहे. विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु असताना आमदार आणि माजी मंत्री आदित्य ठाकरे मुख्यमंत्र्यांच्या भेटीला गेले. यावेळी त्यांच्यासोबत आमदार वरुण सरदेसाई, सचिन अहिरदेखील होते. या सगळ्यांनी मुंबईतील काही प्रश्नांसंदर्भात मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. ही भेट ५ ते १० मिनिटांची होती. पोलीस वसाहत, गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नांसंदर्भात ठाकरेंनी फडणवीस यांच्याशी चर्चा केली. दोन्ही नेत्यांची भेट विधिमंडळात चर्चेचा विषय ठरली.सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित विषयांवरही दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली. सार्वजनिक बांधकाम विभाग उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आहे. महायुती सरकार २.० सत्तेत आल्यापासून मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री शिंदे यांच्यात सातत्यानं शीतयुद्ध सुरु आहे. शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना घेतलेले काही निर्णय फडणवीसांनी मुख्यमंत्रिपद त्यांच्याकडे येताच फिरवले. तर काही निर्णयांना स्थगिती दिली. त्यामुळे दोन्ही नेत्यांमध्ये सुप्त संघर्ष सुरु असल्याची चर्चा आहे.मुख्यमंत्री फडणवीस मागील सरकारच्या कालावधीत झालेल्या निर्णयांना स्थगिती देत असताना, काही निर्णयांच्या चौकशांचे आदेश देत असताना ठाकरेंची शिवसेना मुख्यमंत्र्यांचं कौतुक करत आहे. त्यामुळे फडणवीस आणि ठाकरे यांच्यातील अंतर कमी होत असल्याची चर्चा रंगू लागली आहे. शिंदेंवर घणाघाती टीका करणारी ठाकरेंची शिवसेना मुख्यमंत्री फडणवीस



यांच्यावर मात्र तितकी टीका करताना दिसत नाही. मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुरेसं संख्याबळ नसताना ठाकरेंच्या सेनेला विधानसभेचं विरोधी पक्षनेतेपद दिलं आहे. त्यामुळे आता विरोधी पक्षनेत्यांची तोफ नेमकी कोणाकडे वळणार, याची उत्सुकता आहे.

## राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती समितीची निवड....

## उत्सव समितीच्या कार्याध्यक्षपदी अर्चित हिरोळे तर सचिवपदी दीपक मोरे यांची निवड....

**जनसंचलन/बुलढाणा**

राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती बुलढाणा २०२५ च्या पदाधिकाऱ्यांची बैठक दिनांक ४ मार्च २०२५ रोजी शासकीय विश्राम भवानी येथे संपन्न झाली या बैठकीच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले व विश्व रत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती २०२५ चे विद्यमान अध्यक्ष निलेश राऊत हे होते यावेळी दिनांक ११ एप्रिल ते १४ एप्रिल २०२५ विविध सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे यासंदर्भात चर्चा करण्यात आली व यातून सर्वांचे मत जाणून घेतली यावर्षीची जयंती उत्सव हा भारतीय संविधानाच्या ७५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून त्या अनुषंगाने कार्यक्रमाचे आयोजन







करण्यात येणार असल्याचे ठरवण्यात सर्वानुमते आले यासाठी सार्वजनिक उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली यावेळी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव २०२५ समितीच्या कार्याध्यक्ष पदी अर्चित हिरोळे तर सचिव पदी पत्रकार दीपक मोरे कोषाध्यक्षपदी अमोल वाठोरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली यावेळी बैठकीस राहुल कासारे अमोल खरे कुणाल पैठणकर सिद्धार्थ आराख प्रेम इंगळे निलेश गायकवाड सनी पैठणे सुरेश सरकटे अजय जाधव स्वप्निल कासारे सुरज सोनवणे ऋषिकेश जाधव यांच्यासह असंख्य नागरिक उपस्थित होते

## अंगणवाडी सेविका, मदतनीस भरती पारदर्शक पद्धतीने कुठल्याही आमिषाला बळी पडू नका

**जनसंचलन/ जळगाव जा**

बाल विकास प्रकल्प कार्यालय खामगाव अंतर्गत २३ ग्रामपंचायतीमध्ये दोन सेविका व २३ मदतनीस असे एकूण २५ रिक्त पदाची भरती होणार आहेत. या पदाकरीता शुक्रवार दि. ७ मार्च २०२५ पर्यंत अर्ज स्विकृत केले जाणार असून इच्छुक उमेदवारांनी अर्ज सादर करावा, असे आवाहन बाल विकास प्रकल्प अधिकारी राजेश वाघ यांनी केले आहे. भरती प्रक्रिया अत्यंत पारदर्शकपणे पार पाडली जाणार आहे. त्यामुळे नागरिकांनी कुठल्याही आमिषाला बळी पडू नये व कोणत्याही गैरमार्गाचा वापर करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

## नीलम गोऱ्हे यांच्या विरोधात अविश्वासाचा प्रस्ताव, विधान परिषदेचं उपसभापतीपद जाणार?

**वृत्तसंस्था/मुंबई**

विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्याबाबत महत्त्वाची माहिती समोर येत आहे. नीलम गोऱ्हे यांच्या विरोधात विरोधकांनी अविश्वासाचा ठराव दाखल केला आहे. विरोधकांकडून नीलम गोऱ्हे यांच्या विरोधातील अविश्वासाचा प्रस्ताव विधीमंडळ सचिवांकडे सादर करण्यात आला आहे. विशेष म्हणजे नीलम गोऱ्हे या अधिवेशन सुरु झाल्यापासून गेल्या दोन दिवसांपासून विधीमंडळाच्या कामकाजात सहभागी झालेल्या नाहीत. त्या दोन दिवसांपासून अधिवेशनात अनुपस्थित आहेत. पण त्या उद्या विधीमंडळाच्या कामकाजात सहभागी होणार असल्याची माहिती आहे. गेल्या दोन दिवसांपासून त्या आजारी असल्याने अधिवेशनासाठी उपस्थित राहू शकल्या नसल्याची माहिती आहे. महाविकास आघाडीच्या तीनही पक्षांनी नीलम गोऱ्हे यांच्याविरोधात अविश्वासाचा प्रस्ताव दाखल केला आहे. तीनही पक्षांकडून एकत्रितपणे विधीमंडळ सचिवांकडे अविश्वासाचा प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे. नीलम गोऱ्हे यांच्या विरोधात अविश्वासाचा प्रस्ताव का दाखल करण्यात आला? याबाबत राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या चर्चा सुरु आहेत. पण खरं कारण समोर आलेलं नाही. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीदेखील आज माध्यमांसोबत बोलताना त्यामागील कारण सांगितलेलं नाही. त्यामुळे गोऱ्हे यांच्यावरील अविश्वासाच्या प्रस्तावाबाबत सस्पेन्स वाढला आहेनीलम गोऱ्हे या विधान परिषदेच्या उपसभापती



बनल्या तेव्हा शिवसेना एकसंघ होती. पण शिवसेना फुटीनंतरही नीलम गोऱ्हे या त्याच पदावर कार्यरत आहेत. त्यामुळे या मुद्द्यावरुन त्यांच्याविरोधात विरोधकांनी अविश्वासाचा प्रस्ताव दाखल केल्याची शक्यता वर्तवली जात आहे. नीलम गोऱ्हे यांनी नुकतंच दिल्लीतील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या कार्यक्रमात माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याबाबत गंभीर आरोप केला होता. उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वातील शिवसेनेत दोन मर्सिडीज गाड्या दिल्यावर एक पद मिळायचं, असा आरोप नीलम गोऱ्हेंनी केलं होतं. त्यांच्या या आरोपांमुळे विरोधकांनी त्यांच्यावर अविश्वासाचा प्रस्ताव आणला का? अशी देखील चर्चा आहे.खरा अविश्वासाचा प्रस्ताव आणायला आमच्याकडून उशिरच झाला. आतापर्यंत त्या निलंबितच व्हायला पाहिजे होत्या. अविश्वाचा प्रस्ताव आणल्यानंतर या अधिवेशनातच त्याबाबत चर्चा होणं अपेक्षित आहे. कुणीही असो, ज्याने एखाद्या नियमाचा आणि कायद्याचा भंग केला असेल, अविश्वासाचा ठराव ज्या कारणासाठी आणला ती कारणं तुमच्यासमोर येतील. पण पक्षांतर हाही एक विषय आहे. यापूर्वीच हा ठराव मांडला पाहिजे होता, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958